२८८९१ ८०

तात्काळ

# कायम विनाअनुदान (इंग्रजी माध्यम)

जा.क्र.शिऊसं/प्राशि-३/नखाप्राशा/पुवि-०९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 2 DEC 2009

प्रति,

शिक्षण प्रमूख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,पिंपरी,पुणे.

विषय : २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . .

संदर्भ : १.शासन निर्णय क्र.नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि३दि.२०.८.२००९
२.मा.प्र.शिक्षण सहसंचालक (प्राथ.),प्राथमिक शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे, यांचे पत्र क्र.नप्राशा/२००८-०९/इंग्रजी/मान्यता/ड ५१२(ब)/३७२८ दि.८/१०/२००९.

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९ - २००१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | दि के . चंदुभाई दारुवाला एज्यु.सोसा. ३ओ/१४७, सॅलसबरी पार्क पुणे् ३७ | ग्रीनवुड स्कूल प्लॉट नं. ६१, हडपसर पुणे् २८ | पहिली | इंग्रजी |

## कायम विनाअनुदानीत

त्यामूळे या संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी..
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.
११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३ शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ मधील तरतूदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली सदर शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगीचे आदेश रद्द झाले आहेत.असे गृहीत धरले जाईल.सदर शाळा १८ महिन्याच्या आत संस्था सुरु करणार असल्यास तसा संस्थेचा ठराव सादर करण्यात यावा. सदर शाळा २००९-१० मध्ये सुरु केलेली नसल्यास व भविष्यात शाळा सुरु करावयाची नसल्यास त्याबाबत संस्थेचे लेखी पत्र आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

१५ संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यांत यावी. (उदा:- नांव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

१६ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१ शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२ शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३ शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India ) अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर, २००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

(कु-हाडे सु. जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता..

**स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.**
**यांची सही असे.**

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

प्रत : १.मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२.मा. शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

प्रत : अध्यक्ष/सचिव
दि के . चंदुभाई दारुवाला एज्यु.सोसा. ३अे/१४७, सॅलसबरी पार्क पुणे ३७

प्रत : शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,पुणे.

**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
**१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१**
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/पुवि/२०१८-१९/ ४३४० दिनांक- 11 JUN 2018

**प्रति,**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर/पुणे/सोलापूर

**विषय-** राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत

**संदर्भ-** १. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा. पुणे यांचे पत्र जा.क्र. खाप्राशा-२०१८/वर्गवाढ/ ड ५१२-अ-१/२४०० दि २३.०५.२०१८
२. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. ०२/एसएम-५, दि. १७.०१.२०१८
३. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. ९/एसएम-५, दि. १५.०२.२०१८
४. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. १०/एसएम-५, दि. २६.०२.२०१८
५. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. १३/एसएम-५, दि. १५.०२.२०१८
६. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. १९/एसएम-५, दि. १२.०३.२०१८
७. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. २४/एसएम-५, दि. १९.०४.२०१८
८. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. २७ भाग-१/एसएम-५, दि. १८.०५.२०१८

अहमदनगर/पुणे/सोलापूर जिल्हयातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या व शर्तींच्या अधिन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

| शासन यादी क्र. | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | वर्ग | मंजूर वर्ष |
|---|---|---|---|---|
| १२ | इंदिरा मेमोरियल इंग्लिश स्कुल, मिरजगांव, ता. कर्जत, जि. अहमदनगर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| १ | सदगुरू धुळेश्वर महाराज विद्यालय, मंद्रुप, ता. द. सोलापूर | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| १ | दि जिनियस इंग्लिश मिडीयम हायस्कूल हिंजवडी, ता. मुळशी जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | श्री नागेश्वर न्यु इंग्लिश स्कुल मोशी, ता. हवेली, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ३ | ग्रिनवूड स्कुल हडपसर, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| १ | युनिव्हर्सल स्कुल पेरणे, ता. हवेली, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ९ | स्व विलास बानकर इंग्लिश मिडीयम स्कुल ब्राम्हणी, ता. राहुरी, जि. अहमदनगर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| १ | सेंट मेरीज पब्लीक स्कुल, डेक्कन कॉलेज रोड, येरवडा, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ३ | वंडरलॅंड इंग्लिश मिडीयम स्कुल, हडपसर, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | सिध्दांत इंटरनॅशनल स्कुल, सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |

**अटी व शर्ती :-**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार भौतिक सोयी सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
२. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
३. सदर वर्गास विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर/पुणे/सोलापूर यांनी करावी.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास, संचालनालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.१.

**प्रत :**

E:\PR-2\Swayarthsahait\Order.docx



Scanned by CamScanner

१. मा. शिक्षण संचालक (प्राथ) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मुख्याध्यापक, इंदिरा मेमोरियल इंग्लिश स्कुल, मिरजगांव, ता. कर्जत, जि. अहमदनगर
३. मुख्याध्यापक, सदगुरू धुळेश्वर महाराज विद्यालय, मंद्रुप, ता. द. सोलापूर
४. मुख्याध्यापक, दि जिनियस इंग्लिश मिडीयम हायस्कूल हिंजवडी, ता. मुळशी जि. पुणे
५. मुख्याध्यापक, श्री नागेश्वर न्यु इंग्लिश स्कुल मोशी, ता. हवेली, जि. पुणे
६. मुख्याध्यापक, ग्रिनवूड स्कुल हडपसर, पुणे
७. मुख्याध्यापक, युनिव्हर्सल स्कुल पेरणे, ता. हवेली, जि. पुणे
८. मुख्याध्यापक, स्व विलास बानकर इंग्लिश मिडीयम स्कुल ब्राम्हणी, ता. राहुरी, जि. अहमदनगर
९. मुख्याध्यापक, सेंट मेरील पब्लीक स्कुल, डेक्कन कॉलेज रोड, येरवडा, पुणे
१०. मुख्याध्यापक, वंडरलँड इंग्लिश मिडीयम स्कुल, हडपसर, पुणे
११. मुख्याध्यापक, सिध्दांत इंटरनॅशनल स्कुल, सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे



Scanned by CamScanner

जा.क्र.शिउसं/माध्य-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पूवि/२०१८-१९/ ५८०६

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 21 AUG 2018

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

प्रति

अध्यक्ष/सचिव,

लिम्स एज्युकेशन सोसायटी, मु.पो. खेड, ता. राजगुरूनगर, जि. पुणे

विषय - सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जून २०१२.

३. शासन निर्णय क्रं. एसएफएस-१०१८/प्र.क्र.१३०/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि ०८.०८.२०१८

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | लिम्स एज्युकेशन सोसायटी, मु.पो. खेड, ता. राजगुरूनगर, जि. पुणे | जिनिअस् इंग्लिश मिडिअम स्कुल, हिंजेवाडी, पुणे | इंग्रजी | दर्जावाढ (राज्यमंडळ) | उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक (इ. ९ वी ते इ. १० वी) | २०१८-१९ |

**अटी व शर्ती :-**

१. शासन निर्णयातील अट क्र. १ नुसार सदर संस्थेने लगतच्या तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल व इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे शाळा मान्यता आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे ३ महिन्यात सादर करणे आवश्यक आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी सदर शाळेस प्रथम मान्यता देताना उपरोक्त अटीची पुर्तता झाली किंवा नाही याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून खात्री करूनच प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. सदर शाळेनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

४. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

५. ज्या व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुबंई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

१०. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

(…क्षी राऊत)

प्र.शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Scanned by CamScanner

तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/ 6409

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक - 11 SEP 2018

प्रति

अध्यक्ष/सचिव,
दि के चंदुभाई दारूवाला एज्युकेशन सोसायटी, पुणे

विषय - सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.
३. शासन निर्णय क्रं. एसएफएस-१०१८/प्र.क्र.९२४/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि ०५.०९.२०१८

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तींवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | दि के चंदुभाई दारूवाला एज्युकेशन सोसायटी, पुणे | ग्रीनवुड्स स्कुल, इंद्रपस्थ सोसायटी, आकाशवाणी जवळ, हडपसर, पुणे-४११०२८ | इंग्रजी | दर्जावाढ (राज्यमंडळ) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक व उच्च माध्यमिक (इ. ९ वी ते १० वी | २०१७-१८ |

अटी व शर्ती :-

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

५. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जांची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७.
संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

MRaut

(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.